N-129

मसुदा मान्यतेस्तव सादर

उप. रचनाकार

सह. वास्तुशास्त्रज्ञ

व.न.र

मा. मु. नि.

मा. मु. का. अ.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

अधिसूचना

क्र. मऔविम/आय. आय.ए.(लॉजिस्टिक पार्क)/पी-२३७४३२/२०२५

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१

ज्याअर्थी, शासनाचे उद्योग, उर्जा व कामगार विभागाची अधिसूचना म.औ.धो.-१९१६/प्र.क्र.२२१/उद्योग-२ दिनांक १४ फेब्रुबारी २०१४ व क्र.म.औ.धो.-२०२३/प्र.क्र.२२३/उद्योग-२ दिनांक २६ ऑगस्ट २०२४ ची अधिसूचना अन्वये महाराष्ट्राचे लॉजिस्टीक धोरण जाहीर करणेत आले. (यापुढे उक्त धोरण असे नमूद केले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त धोरणा नुसार राज्यात एकात्मिक लॉजिस्टीक पार्कच्या विकासनासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केले आहे,

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे कलम ४३-(१ब) नुसार महामंडळास कोणत्याही औद्योगिक क्षेत्राला राजपत्रातील अधिसुचनेव्दारे -एकात्मिक औद्योगिक क्षेत्र म्हणून अधिसूचित करता येईल आणि अशी अधिसुचना काढल्यावर, महामंडळ हे, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये अशा एकात्मिक औद्योगिक क्षेत्राकरीता विशेष नियोजन प्राधिकरण होईल;

आणि ज्याअर्थी, मे. सेन्ट्रल इंडिया लॉजिस्टीक प्रा.लि., यांनी अर्जान्वये मौजे. मोहगांव (खु.), ता. नागपुर (ग्रामीण), जि. नागपूर येथील अस्तित्वातील अधिसुचित ९.९१ हे.आर. क्षेत्राला एकात्मिक लॉजिस्टीक पार्क मध्ये समाविष्ट करण्याची महामंडळास विनंती केली आहे;

आणि ज्याअर्थी, मे. सेन्ट्रल इंडिया लॉजिस्ट्रीक प्रा.लि., यांच्या मौजे. मोहगांव (खु), ता. नागपुर (ग्रा), जि. नागपूर येथील ९.९१ हे.आर. क्षेत्राला दि. ०२/०८/२०२४ रोजी संपन्न झालेल्या १६४ व्या उच्चाधिकार समितीची मान्यता मिळाली आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाने त्यांची अधिसुचना क्र. आय.डी.सी.२०२५/प्र.क्र.२६९/उद्योग-१४,दिनांक

१० जुलै २०२५, अन्वये मौजे. मोहगांव (खुर्द), ता. नागपूर (ग्रामीण), जि. नागपूर येथील ९.९१ हे.आर. क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे कलम २ खंड (ग) अन्वये औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहिर केले आहे;

आणि ज्याअर्थी, दि. ०१/१०/२०२० रोजी संपन्न झालेल्या १२७ व्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीच्या इतिवृत्ता नुसार एकात्मिक औद्योगिक क्षेत्र घोषित करण्यासाठीच्या महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ मधील कलम ४३-(१ब) अन्वये एकात्मिक लॉजिस्टीक पार्कच्या प्रकरणांची कारवाई करण्यात यावी असे निर्देश महामंडळास देण्यात आले आहे;

त्या अर्थी, शासनाचे महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (सन-२०१३ चा सुधारणा अधिनियम, १५) च्या कलम ४३ खंड-(१ब) अन्वये महामंडळास प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन, निन्मस्वाक्षरीकार म्हणजे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ याव्दारे उपरोक्त अधिसूचना झालेल्या मौजे. मोहगांव (खुर्द), ता. नागपूर (ग्रामीण), जि. नागपूर येथील खालील अनुसुचित उल्लेखिलेल्या औद्योगिक खाजगी क्षेत्रास -एकात्मिक औद्योगिक क्षेत्र (लॉजिस्टीक पार्क) म्हणून घोषित करीत आहे.

उक्त अधिसूचनेची प्रत व सोबत स्थळ निश्चिती चतु;सिमा दर्शविलेला नकाशा हा या अधिसूचनेचा भाग समजण्यात यावा.

अनुसूची

मौजे मोहगांव (खुर्द), ता. नागपूर (ग्रामीण), जि. नागपूर

| अक्र. | सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर. |
|---|---|---|
| १. | ४९ | ५.०१ |
| २. | ७५/१ | ०.९७ |
| ३. | ७५/२ | ३.९३ |
| | एकुण | ९.९१ |

चतु : सीमा

उत्तरेस : नाला

दक्षिणेस : मौजे मोहगाव सर्व्हे नं. ७४, ७६.

पूर्वेस : मौजे मोहगाव सर्व्हे नं. ४४,७७

पश्चिमेस : मौजे मोहगाव सर्व्हे नं. ५०,७१ व रस्ता.

ठिकाण : मुंबई-९३.

दिनांक : / /२०२५

पी. वेलरासु, भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ